वर्ष : ०४ | अंक: ४८ | मुंबई, मंगळवार २३ ऑक्टोबर २०१८ ते २९ ऑक्टोबर २०१८ | पृष्ठ: ४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 व्यावसायिक वाहनांचा प्रवाशांच्या जिवाशी खेळ

3 → डिजिटल राष्ट्रवाद

रावणदहन पाहाणाऱ्या ६१ जणांना रेल्वेने चिरडले ← 4

### आश्रय ट्रस्ट आयोजित मिरा-भाईंदर महापालिकेच्या सहयोगाने

## स्वच्छता ॲप जनजागृती मोहीमेस उपायुक्तांच्या हस्ते शुभारंभ


दिनांक २२ रोजी मिरा-भाईन्दर महापालिकेच्या हद्दीत मांडवी तलाव, नगर भवन हॉल भाईन्दर (प.) येथे आश्रय ट्रस्ट आयोजित मोबाईल स्वच्छता ॲपसाठी मिरा-भाईन्दर महानगरपालिका उपायुक्त डॉ. संभाजी पानपट्टे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी अनेक वेगवेगळ्या ट्रस्टचे कार्यकर्ते हजर होते. मागील २०१८ मध्ये बनवलेल्या या मोबाईल ॲपला पाहिजे तसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे याचे फायदे जनसामान्यांत पोहोचत नव्हते. यावेळी आश्रय ट्रस्टचे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक,

उर्वरित पृष्ठ 4 वर










### मीरा-भाईंदरमध्ये शासकीय आदेशाला केराची टोपली

## मराठी एकीकरण समितीची तंबी

***भाईंदर - महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय कामकाज मराठी भाषेतूनच करण्याची अधिसूचना शासनाने काढून त्याचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे जाहीर केले असताना मीरा-भाईदरमध्ये मात्र महापालिकेने रस्त्याच्या नावाचे फलक गुजराती भाषेत लावण्याचे काम सुरु केले आहे. मराठी एकीकरण समितीने त्याचा निषेध करत अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासण्याची तंबी दिली आहे.***

मीरा-भाईंदर महापालिकेने भाईंदर पश्चिम येथील नारायण नगर भागातील एका रस्त्याला श्रीमद बुद्धीसागर सुरी चौक असे नामकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार स्थायी समितीचे सभापती ध्रुवकिशोर पाटील यांच्या कार्यालयाजवळ असलेल्या या चौकाला नामफलक फक्त गुजराती भाषेतच लावला. शासनाच्या धोरणानुसार हा फलक मराठीतच असणे आवश्यक होते. त्यामुळे भाईंदर परिसरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या गेल्या. अनेक सामाजिक संस्था, तसेच नागरिकांनीसुद्धा याला विरोध दर्शविला. मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख आणि कार्याध्यक्ष प्रदीप सामंत यांनी जोरदार आक्षेप घेत महापालिकेच्या कारभाराचे वावडे काढले आहेत. शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवीत मराठी भाषेचा होणारा अपमान सहन केला जाणार नाही, अशी तंबी त्यांनी पालिका प्रशासनाला दिली आहे.




*शासनाने वेळोवेळी परिपत्रक काढून १००ज्ञ मराठी भाषेच्या वापराचे आदेश दिले आहेत. तरीसुद्धा मराठी भाषेची गळचेपी थांबली नाही, लोकशाही मार्गाने दोषी अधिकाऱ्यावर शिष्टभंगाची कारवाई न झाल्यास त्यांच्या तोंडाला काळे फासून निषेध व्यक्त करु.*

*- प्रदीप सामंत, महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष मराठी एकीकरण समिती*




## भाजपाची शिवसेनेला 'शाही' धमकी

**मुंबई - केंद्रात आणि राज्यात भाजपासोबत सत्तेत राहून भाजपावरच टीका करणाऱ्या शिवसेनेला सोमवारी भाजपाध्यक्ष अमित शाह यांनी अल्टिमेटम दिल्याचे वृत्त आहे. शिवसेनेने युतीबाबत आताच निणऱ्य घ्यावा, अन्यथा आम्ही लोकसभा निवडणुकीसोबतच विधानसभेची निवडणूक घेऊ, असा इशारा भाजपाध्यक्षांकडून सेनेला देण्यात आल्याचे वृत्त आहे.**

मराठी वृत्तवाहिनी एबीपी माझाने यासंदर्भातील वृत्त प्रसारित केले आहे. या वृत्तानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपावर शिवसेनेकडून सातत्याने होत असलेल्या टीकेमुळे भाजपामध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. भाजपावर टीका करायची पण युतीबाबतचा संभ्रमही कायम ठेवायचा, अशी खेळी सेना नेतृत्वाकडून खेळण्यात येत आहे. त्यामुळे भाजपा नेतृत्वाकडून शिवसेनेला युतीबाबत आताच निर्णय घ्या, असे थेट अल्टिमेटमच देण्यात आले आहे. जर शिवसेनेने युतीबाबत आताच काही स्पष्ट भूमिका घेतली नाही, तर राज्यातील विधानसभा बरखास्त करून लोकसभेच्या निवडणुकीबरोबरच राज्यातील विधानसभेच्या निवडणुकाही घेतल्या जातील, असा इशारा अमित शाह यांनी शिवसेनेला दिला आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीसाठी युतीबाबत शिवसेना अद्यापही स्पष्ट भूमिका घेत नसल्याने त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी भाजपाकडून ही चाल खेळण्यात येत असावी, अशी शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तवण्यात येत आहे.

## सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन तर्फे ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा करुन व भेटवस्तू देऊन सत्कार

दिनांक ०७ ऑक्टोंबर रोजी अंधेरी साईवाडी या परिसरात प्रति मासीक जेष्ठ नागरिकांचा वाढदिवस व भेटवस्तू देऊन सत्कार आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट सलंग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशनतर्फे वेगवेगळया क्षेत्रातील अधिकारी, पोलिस अधिकारी यांच्या हस्ते करण्यात येतो. सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठांच्या वाढदिवस सत्कार समारंभाबरोबर जेष्ठांना मार्गदर्शन करण्यात येते. सरकारी योजनांची माहिती देऊन त्यांना सहकार्याची मदत केली जाते. हे खूपच अतिशय महत्वाचे कार्य आहे, असे मुंबई महानगर पालिकेचे अंधेरी विभागाचे समाज विकास अधिकारी, आरोग्य विभाग यांनी सांगितले. फाऊंडेशनच्या वतीने निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त जसपालसिंग रागी यांच्या हस्ते त्यांना शाल, पुष्प देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर निवृत्त पालिका अधिकारी संजिवनी थोरबोले, निवृत्त पोलीस अधिकारी पंढरीनाथ खंडागळे, साहित्यिकअधिकारी अनंत दाभोळकर, निवृत्त सहाय्यकपोलीस आयुक्त जसपालसिंग रागी, अध्यक्षा तुकाबाई चौधर, किसन शेवाळे आदी मान्यवर उपस्थित होते. निवृत्त पालिका अधिकारी संजिवनी थोरबोले यांनी सांगितले की, वय वाढत चालले की, स्मृतीभ्रंशाचा त्रास होत असतो. त्यामुळे स्वतःचा स्वतःलाच मनस्ताप होऊ शकतो. स्वतःचे स्वतःलाच

उर्वरित पृष्ठ 2 वर





## नायजेरियन तस्करांचा पोलिसांवर हल्ला

नायजेरियन ड्रग्ज तस्करांना पकडण्यासाठी मुंबई पोलिस, रेल्वे पोलिस, आरपीएफ यांनी बुधवारी सॅण्डहर्स्ट रोड स्थानकाजवळ खास मोहीम हाती घेतली. मात्र, सुमारे चार तास चाललेल्या या मोहिमेदरम्यान या तस्करांनी पोलिसांनी हल्ला केला. हल्ल्यात रेल्वे सुरक्षा बलाचा (आरपीएफ) जवान जखमी झाला. या कारवाईत एक तस्कर पोलिसांच्या तावडीत सापडला असला तरी सात जण पळून जाण्यात यशस्वी झाले.

अंमली पदार्थ तस्करांविरोधात कारवाईसाठी अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रवीण पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त अविनाश धर्माधिकारी, वरिष्ठ निरीक्षक संदीप बागडीकर आणि रेल्वे सुरक्षा बलाचे निरीक्षक राजेश निलमवार यांच्यासह जवानांचे



पथक तयार केले होते. बुधवारी रात्री ४० ते ४५ जणांचे पथक वाडीबंदर येथील रेल्वे यार्डात गेले. तेथे लपून बसलेल्या सात ते आठ नायजेरियन तस्करांनी पोलिसांना पाहून यार्डाबाहेर उड्या टाकून पळण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला असता, अंधाराचा फायदा घेऊन त्यांनी पोलिसांवर हल्ला केला. यामध्ये आरपीएफचे सलीम शेख हे जखमी झाले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

# तुम्हाला जमत नसेल, तर राममंदिर आम्हीच बांधू

## *पक्षाच्या 52व्या मेळाव्यात उद्धव ठाकरेंची भाजपवर जोरदार टीका*




**मुंबई - अयोध्येत राममंदिराची उभारणी करणे सरकारला जमत नसेल, तर तसे जाहीर करावे. आम्ही ते उभारू, अशी घोषणा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी शिवाजी पार्कवरील दसरा मेळाव्यात केली.**

पक्षाच्या या ५२व्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका केली, पण त्यांची भाषा संयत होती. युती तोडण्याबाबत त्यांनी ठोस उल्लेख केला नसला, तरी हिंदुत्वासाठीच आम्ही सत्तेत आहोत, असे सांगत जनतेच्या प्रश्नांवर सरकारशी संघर्षही कायम राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'अच्छे दिन'चे नारे देत सत्तेवर आलेल्या सरकारने नंतर त्या सर्व घोषणा म्हणजे 'जुमलेबाजी' होती, असे निर्लज्जपणे जाहीर केले. मग आता राममंदिर हासुद्धा जुमलाच होता का, असा बोचरा सवालही ठाकरे यांनी केला. राममंदिर रखडल्याचा जाब सरकारला विचारण्यासाठी मी २५ नोव्हेंबरला अयोध्येला जाणार आहे, असेही उद्धव यांनी जाहीर केले. पंतप्रधानपदी आल्यापासून गेल्या साडेचार वर्षांत मोदी एकदाही अयोध्येला का फिरकले नाहीत, असा सवालही त्यांनी केला.

बाबरी मशीद पडून इतका काळ लोटला. कोणीही पंतप्रधान किंवा मुख्यमंत्रीपदी आला तरी महागाईचा रावण तसाच उभा राहतो पण राम मंदिर काही उभे राहत नाही. 'मंदिर वही बनाएंगे' असा नारा दिला जातो, मात्र 'तारीख नही बताएंगे,' हाच पवित्रा कायम असतो, असा टोलाही ठाकरे यांनी लगावला. सरकारवर सतत टीका करणारी शिवसेना सत्तेतून बाहेर का पडत नाही, या प्रश्नाचा उल्लेख करून त्यांनी उलट सवाल केला की, "भाजप सत्तेत येण्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रयत्न कारणीभूत आहेत. मग ते भाजपला आता सत्तेतून बाहेर का काढत नाहीत, असा प्रश्न त्यांनाही कुणी का विचारीत नाही?"

देशात कुणीही हिंदुत्वाबद्दल बोलत नव्हते तेव्हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हिंदुत्वाचा नारा दिला. आजही देशातला हिंदू मेलेला नाही. हिंदू आणि मराठी माणसासाठी लढणारा शिवसेना हा एकमेव पक्ष आहे, असेही ठाकरे म्हणाले. राम मंदिराच्या उभारणीचा विषय काढल्याबद्दल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे ठाकरे यांनी अभिनंदन केले.

जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी केंद्रातील सरकारवर टीका करीत असलो तरी नरेंद्र मोदी हे काही आमचे दुश्मन नाहीत. तुमचा पराभव व्हावा आणि आम्ही तिथे बसावे अशी काही आमची इच्छा नाही. सरकारवर टीका करूनही हिंदुत्वासाठी शिवसेना भाजपसोबत आहे, असे सूचक विधान करीत उद्धव यांनी सर्व राजकीय पर्याय खुले ठेवले. पुढील राजकीय वाटचाल कठीण आहे. अग्निपथ आहे. शिवसैनिकांनी दिल्लीत भगवा फडकवण्यासाठी सज्ज राहावे, असे आवाहनही ठाकरे यांनी केले. मोदी सरकारने काश्मीरला संपूर्ण देशापेक्षा वेगळी आणि विशेष वागणूक देणारे घटनेचे कलम ३७० रद्द करण्यासाठी लोकसभेत ठराव आणावा, अशी मागणीही त्यांनी केली. हिंदूंच्या सणांवर नियमांची सक्ती केली जात असल्याचेही ते म्हणाले. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती, रुपयाची घसरण, महागाई, दुष्काळ, अच्छे दिन यावरून ठाकरे यांनी केंद्र सरकारवर टीका केली. निवडणुकीत अशीच आश्वासने देऊन टाकली हे केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांचे विधान निर्लज्जपणाचे असल्याचेही ठाकरे यांनी सुनावले.

महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती आहे. राज्यातील जनता पाणीटंचाईमुळे होरपळत आहे. शेजारच्या कर्नाटक सरकारने जुन्या निकषांनुसार दुष्काळ जाहीर करून टाकला आहे. मग केंद्रात आणि राज्यात भाजपचेच सरकार असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अशी धमक का दाखवीत नाहीत, असा सवाल ठाकरे यांनी केला. तातडीने दुष्काळ निवारणाच्या उपाययोजना सुरू करा नाही तर सरकारमध्ये असलो तरी शिवसेना दुष्काळग्रस्तांसाठी रस्त्यावर उतरेल, असा इशारा ठाकरे यांनी दिला.

खासदार संजय राऊत, पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी आपल्या भाषणात भाजपला गाडून टाकण्याची भाषा केली होती. शिवसेनेचा मेळावा सुरू असतानाच व्यासपीठाच्या मागील बाजूस कार्यक्रम संयोजनासाठी उभे असलेले शिवसेना आमदार सुनील प्रभू, अजय चौधरी, जनसंपर्क अधिकारी हर्षल प्रधान यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांचा पोलिसांशी वाद झाला. पोलिसांनी त्यांना बळजबरीने बाहेर काढले. त्यामुळे शिवसेनेचे पदाधिकारी आणि पोलीस यांच्यात वाद निर्माण झाला होता. परंतु या वेळी शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी मध्यस्थी केल्यानंतर हा वाद मिटला.

# पोलिसांनी केला मुंबईतील 'ऑनलाइन जॉब रॅकेट'चा पर्दाफाश; बंगळुरूपर्यंत धागेदोरे

**मुंबई :** परदेशात नोकरी देण्याचे आमिष दाखवून बेरोजगारांकडून लाखो रुपयांची लूट करणाऱ्या रॅकेटचा मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाने बुधवारी पर्दाफाश केला. अजय गुप्ता (२३), सॅंद्रिक रॉबर्ट (२३), विघ्नेश सुरेश के सी (२२) आणि नेहा पंचरिया (२३) अशी अटक आरोपींची नावे असून ते सर्व बंगळुरूचे आहेत. 'इंटरनॅशनल जॉब्स ॲण्ड फ्री रिक्रुटमेंट' या नावाने ते ऑनलाइन रॅकेट चालवित होते. मुंबई क्राईम ब्रॅंच-११ने ही कारवाई केली.





लक्ष्मीकांत शितांबरम् (६१) हे काही वर्षांपूर्वी आखाती देशातून निवृत्त झाले. त्यानंतर पुन्हा परदेशात नोकरी मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. दरम्यान, त्यांनी फेसबुकवर जाहिरात पाहिली. त्यात कॅनडा, यू.एस.ए., यू.ए.ई. या देशांत कोणतेही शुल्क न आकारता भरघोस पगाराच्या नोकरीचे आमिष दाखविण्यात आले होते. त्यानुसार शितांबरम् यांनी बायोडाटा आणि अन्य कागदपत्रे व्हॉट्सअॅप, ईमेलद्वारे पाठविली. त्यानंतर दोघांनी त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांना कॅनडाला नोकरीसाठी पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर विदेशी सिम कार्ड वापरून त्यांना एका व्हॉट्स अॅप ग्रुपमध्ये सहभागी करून घेतले. ग्रुपवर नोकरीला लावलेल्या लोकांचे फोटो, पासपोर्ट होते. त्याद्वारे शितांबरम् यांचा विश्वास संपादन करत प्रोसेस फीच्या नावाखाली वेगवेगळ्या बॅंक खात्यांत जवळपास १ लाख ५४ हजार रुपये त्यांना ऑनलाइन भरायला सांगितले. मात्र, पैसे भरूनही नोकरी मिळाली नाही. विचारणा केल्यावर उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. शितांबरम् यांनी पैसे परत मागितले तेव्हा त्यांना दमदाटी करण्यात आली. शितांबरम् यांनी या प्रकरणी कांदिवली पोलिसांत तक्रार दाखल केली.

**गोरेगावमध्ये सापडला पहिला आरोपी**

गुन्हे अन्वेषण शाखेचा कक्ष ११ यांनी या प्रकरणी तपास हाती घेतला. या टोळीतील पहिला संशयित गुप्ता हा गोरेगावमध्ये आल्याची माहिती कक्षाचे पोलीस निरीक्षक रईस शेख आणि सहायक पोलीस निरीक्षक शरद झिने यांना मिळाली. त्यांनी चौकशीसाठी त्याला ताब्यात घेतले. त्याचे साथीदार बंगळुरूमधून हे रॅकेट चालवित असल्याने त्याने सांगितले. त्यानुसार कक्षाचे प्रमुख चिमजी आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली पथक बंगळुरूला रवाना झाले. तेथून त्यांनी एका महिलेसह अन्य दोघांना अटक केली. महाराष्ट्रासह पंजाब, तामिळनाडू, कर्नाटकमध्ये त्यांनी नोकरीच्या निमित्ताने अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात उघड झाले आहे.

# व्यावसायिक वाहनांचा प्रवाशांच्या जिवाशी खेळ

## मुंबईतील २० हजार व्यावसायिक वाहने योग्यता प्रमाणपत्राविना



**मुंबई -** वाहन चालविण्यासाठी योग्य आहे की नाही याची तपासणी करणारी मुंबईतील परिवहन विभागाची व्यवस्थाच गेले काही महिने ठप्प असल्याने तब्बल २० हजारांहून अधिक व्यावसायिक वाहने वहन योग्यता प्रमाणपत्राविनाच रस्त्यांवर धावत आहेत. यात रिक्षा, टॅक्सी, खासगी बस, बेस्ट, रुग्णवाहिका यांसह अन्य व्यावसायिक वाहनांचा समावेश आहे. तपासणी होत नसल्याने पादचाऱ्यांच्या जिवाशी खेळ होतोच. शिवाय वहन योग्यता प्रमाणपत्र नसल्याने वाहनचालकाला भविष्यात अपघात विमा मंजूर होण्यासही अडचणी येऊ शकतात. त्यामुळे ही व्यवस्था लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

रिक्षा, टॅक्सी, खासगी बस, बेस्ट बस, रुग्णवाहिका यांसह अन्य व्यावसायिक वाहनांनी आरटीओकडून वार्षिक वहन योग्यता तपासणी (फिटनेस) करून घेणे आवश्यक आहे. मुंबईतील सर्व आरटीओत मिळून दररोज जुन्या १,५०० तर नवीन ४०० ते ५०० वाहनांची योग्यता प्रमाणपत्र तपासणी केली जाते. त्यासाठी प्रत्येक आरटीओत २५० मीटरचा चाचणी ट्रॅक असावा लागतो. मात्र

***मुंबईसह राज्यभरात अनेक***

ठिकाणी ट्रॅक नसल्याने हे प्रमाणपत्र देणारी यंत्रणा सक्षम करण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयात एका याचिकेद्वारे करण्यात आली आहे. ट्रॅक चाचणीशिवाय दिले गेलेले प्रमाणपत्र हा फक्त फार्स असून हा रहिवाशांच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार आहे. उच्च न्यायालयाने वारंवार आदेश देऊनही ट्रॅककरिता जागा उपलब्ध करून देण्यात परिवहन विभागाला अपयश आल्याने न्यायालयाने प्रमाणपत्र देण्याच्या कामालाच स्थागिती दिली. त्यामुळे २९ सप्टेंबरपासून वाहनांची तपासणी थांबलेली आहे.

परिणामी सुमारे २० हजार जुनी व नवीन व्यावसायिक वाहने या तपासणीविना आहेत. प्रमाणपत्र नसल्याने वाहन खरेतर रस्त्यावर उतरविता येत नाही. यातील १५ हजार जुनी वाहने प्रमाणपत्राविना धावत असल्याची शक्यता खुद्द परिवहन विभागातील सूत्रांनी व्यक्त केली.

नवीन व्यावसायिक वाहनांना दोन वर्षांनी, तर जुन्या वाहनांना एक वर्षानंतर योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) घेणे आवश्यक असते. अन्यथा आरटीओकडून कारवाईचा बडगा उचलला जातो. मुंबईत तपासणीकरिता ट्रॅक उपलब्ध करून देण्यात पुरेशा जागेअभावी अडचणी येत आहेत. त्यामुळे २९ सप्टेंबरपासून मुंबईतील ताडदेव, वडाळा, अंधेरी आणि बोरीवली आरटीओतील वाहनांची चाचणी घेऊन वहन योग्यता प्रमाणपत्र देण्याचे काम थांबलेले आहे.


पूर्वी नवीन वाहनांना वहन योग्यता प्रमाणपत्र त्या त्या वाहन विक्री करणाऱ्या कंपनीकडूनच उपलब्ध करून दिले जात असे. परंतु न्यायालयाने नव्या वाहनांसाठीही प्रमाणपत्र देण्याच्या सूचना आरटीओला केल्या आहेत. नवीन गाड्यांना नंबरही उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे वाहन मालक वैतागले आहेत. मुंबईत वहन योग्यता प्रमाणपत्राशिवाय उभ्या असलेल्या गाड्यांमध्ये रिक्षा, टॅक्सी, खासगी बस, अग्निशमन दल, बेस्ट बस, रुग्णवाहिका यांसह अन्य व्यावसायिक वाहनांचा समावेश आहे. चाचणी मार्ग उपलब्ध न झाल्यास यात वाढ होण्याची शक्यताही आहे. मुंबईतील वाहनांना ठाणे, पनवेल, नवी मुंबईत चाचणी करता येणार आहे. परंतु, तिथे चाचणी करणे गैरसोयीचे ठरत असल्याचे वाहनमालकांचे म्हणणे आहे.

# प्राथमिक चौकशी करूनच 'मीटू'ची तक्रार दाखल करा

**मुंबईः** लैंगिक आत्याचाराविरोधात 'मीटू' मोहिमेच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रांत आरोपांची राळ उडाली असताना याविषयी मुंबई उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली आहे. तथ्य आणि वस्तुस्थितीला आधार मानून आणि प्राथमिक चौकशी करूनच पोलिसांत तक्रार दाखल करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती या याचिकेमार्फत करण्यात आली आहे. ॲड. सन्नी पुनामिया यांनी ही याचिका केली आहे. 'महिलांवर वाढत्या लैंगिक अत्याचाराविरोधात ही मोहीम उभारण्यात आली. मात्र, आता या मोहिमेचा गैरवापर होत असल्याचे दिसत आहे. काही महिलांकडून आरोप करताना ठोस पुरावे देण्यात येत नसल्याचे दिसत आहे.

# बीडीडी चाळ पुनर्वसनात अपात्रतेचा अडथळा

***मुंबई : वरळी, ना. म. जोशी मार्ग आणि नायगाव येथील बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्प अद्याप पात्रतेच्या फेऱ्यात अडकून पडला आहे. या १५० वर्षे जुन्या चाळींत तब्बल १० हजार कुटुंबे राहत असून त्यापैकी अनेकांना अपात्र घोषित केल्यामुळे गोंधळ उडाला आहे. याबाबत शासनाने नवे धोरण जाहीर केल्यानंतरही पात्रतेचा घोळ कायम राहिला होता. हा घोळ लवकरात लवकर मिटावा यासाठी पात्रता एका महिन्यात निश्चित करण्याचे आदेश मुंबई गृहनिर्माण मंडळाचे सभापती मधु चव्हाण यांनी दिले आहेत.***



बीडीडी चाळ पात्रतेच्या निकषाचा फटका सुमारे तीन हजार रहिवाशांना बसला होता. बीडीडी चाळीतील अनेकांनी आपली घरे वेळोवेळी हस्तांतरित केली आहेत. अनेकांनी येथील घरे विकून अथवा भाडेतत्त्वावर देऊन अन्यत्र स्थलांतर केले आहे. बीडीडी चाळींचा पुनर्विकास करताना गृहनिर्माण विभागाने २८ जून २०१७ रोजी घरांसाठी तसेच रहिवाशांसाठी पात्रता निकष जाहीर करणारा शासन आदेश काढला. या शासन आदेशानुसार ज्यांच्याकडे १९९६ पूर्वीच्या रहिवासाचे पुरावे आहेत अशांनाच पात्र ठरवण्याचे निश्चित करण्यात आले. या पात्रता निकषांसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे पुरावा म्हणून सादर करणे बंधनकारक असून जवळपास तीन हजार रहिवाशांकडे आवश्यक ती कागदपत्रे नसल्याचे अथवा त्यापैकी बहुतेक जण हे १९९६ नंतर बीडीडी चाळीत राहण्यास आल्याचे दिसून आले. यातून पुनर्विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण झाल्यामुळे या तीन हजार रहिवाशांच्या पात्रतेबाबत योग्य तो निर्णय घेण्यासाठी गृहनिर्माण विभागाने हा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला होता.

वास्तव्याची पात्रता २२ एप्रिल २०१७ पर्यंत शिथिल करण्याचे निश्चित झाले. परंतु जुन्या इमारतींच्या पुनर्विकासातील रहिवाशांनाही त्याचा फायदा द्यावा किंवा नाही हे ठरविण्यात न आल्याने संदिग्धता कायम होती. आता चव्हाण यांनी ही पात्रता महिन्याभरात निश्चित करण्याचे आदेश दिल्यामुळे हा प्रश्न सुटेल, असा विश्वास बीडीडी चाळ कृती समितीने व्यक्त केला आहे.

या प्रकल्पाबाबत रहिवाशांमधील संदिग्धता दूर करण्यासाठी मोबाइल ॲप तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे रहिवाशांना प्रकल्पाच्या सद्य:स्थितीची कल्पना येईल, असेही चव्हाण यांनी सांगितले. या मोबाइल ॲपमध्ये प्रकल्पाचे आराखडे, रहिवाशांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधा आदी माहितीचा समावेश आहे. रहिवाशांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देणारी माहिती पुस्तिकाही तयार करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रकल्पाच्या ठिकाणी नमुना सदनिकेसह नियोजनाचे सर्व प्रारूप आराखडे मॉडेल स्वरूपात दाखविण्याची व्यवस्था लवकरच करण्यात येईल, असेही चव्हाण यांनी सांगितले. शिवडी येथील बीडीडी चाळ पुनर्वसन प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल म्हाडातर्फे मुंबई बंदर न्यासाकडे सादर करण्यात आला असून लवकरच हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# ३१ हजार रिक्षाचालकांवर वाहतूक पोलिसांचा कारवाईचा बडगा

**मुंबईः** मग्रुरी, गैरवर्तन, भाडे नाकारण्यासारख्या प्रमादांमुळे प्रवाशांच्या नाराजीचे कारण ठरणाऱ्या रिक्षाचालकांविरोधात आरटीओने वारंवार कारवाईचा बडगा उगारला आहे. मुंबईसह संपूर्ण राज्याचा विचार करताना एका वर्षात सुमारे ३१ हजार बेमुर्वत रिक्षाचालकांवर कारवाई झाली आहे. एप्रिल २०१७ ते सप्टेंबर २०१८ पर्यंतच्या कालावधीत राज्यातील विविध भागांत ही कारवाई झाली आहे.



संपूर्ण राज्यात ज्या भागात रिक्षा सेवा चालवल्या जातात, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाात तक्रारी होतात. कल्याणमध्ये रिक्षाचालकांनी घातलेल्या धुडगुसानंतर स्थानिक पोलिसांकडून कारवाई करण्यात आली. मात्र, त्यापूर्वीच पोलिसांनी कारवाई केली असती तर रिक्षाचालकांवर नियंत्रण राखले गेले असते, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. मुंबईसह अनेक भागात असे मुजोर रिक्षाचालक आढळले आहेत. संपूर्ण राज्यातील ३१,५४१ आकडेवारीचा आकडा पाहिल्यास सर्वात मुजोर रिक्षाचालक मुंबई, ठाण्यात आढळले आहेत. त्यामागोमाग पुणे, नाशिक, कोल्हापूरमधील रिक्षाचालक येत असल्याचे आरटीओच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. रिक्षाचालकांकडून जादा भाडे आकारणे, भाडे नाकारणे, उद्धट वर्तन, अवैध वाहतूक, मीटरमध्ये बदल आदींचा प्रामुख्याने समावेश आहे. एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ पर्यंत २० हजार ४५९ आणि एप्रिल ते सप्टेंबर २०१८ पर्यंत ११ हजार चालकांवर कारवाई झाली आहे.

पृष्ठ १ वरुन

### सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन तर्फे ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा करुन व भेटवस्तू देऊन सत्कार

सावरण्याचा प्रयत्न करावा. फसवणूक होऊ नये याची सावधगिरी बाळगावी. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनी ज्येष्ठांचा सन्मान होणे जरुरीचे आहे. यावेळी सहाय्यकपोलिस आयुक्त (निवृत्त) जसपालसिंग रागी, पंढरीनाथ खंडागळे यांचीही समयसुचक भाषणे झाली. संतोष चौधर यांनी सभासद वर्गणी व वहया वाटपासंबधी सूचना केल्या. सर्व सभासदांना वहयांचे वाटप केले. कार्यक्रमाचे सूत्र संचलन फाऊंडेशनचे सल्लागार अनंत दाभोळकर यांनी केले. आभार किसन शेवाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उल्हास शिरसोळे , महेश शिंदे , दिलीप प्रभू, काशिराम मांडवकर , दिपक महाडिक , किसन उदेक ,संजय नंदा ,हरिशचंद्र रेवाळे यांनी सहकार्य केले. आभार कार्यक्रमानंतर अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

# पालिकेचा स्वच्छतेचा दावा फोल

## केवळ दोन हजार स्वच्छतागृहे उभारली; अनेक धोकादायक स्थितीत

'स्वच्छ भारत अभियाना'अंतर्गत शहरात ५ हजार ३०० शौचालयांची उभारणी करण्याचा दावा करून केंद्र सरकारकडून पाठ थोपटून घेणारी मुंबई महापालिका या कामात मागे पडली आहे. पुरेशी शौचालये तर सोडाच असलेल्या शौचालयांमध्ये पुरेसे पाणी पुरविण्यातही पालिकेला अपयश येत आहे. त्यातच काही शौचालयांची अनेक वर्षांत डागडुजी न झाल्याने ती धोकादायक स्थितीत आहेत. काही ठिकाणची जुनी शौचालये धोकादायक स्थितीत असून रहिवाशांचे हाल होत आहेत. आरोग्यविषयक अनेक प्रश्न निर्माण होत आहे.



पाच हजार शौचालयांचा दावा करणाऱ्या पालिकेला अडीच वर्षांत केवळ २ हजार २५३ शौचालयांचीच उभारणी करता आली आहे. पालिकेच्या अनेक जुन्या शौचालयांची अवस्था दयनीय आहे. मुंबईत स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालयांची उभारणी करण्यासाठी पालिकेने २० प्रभागांमध्ये कत्राटदारांची नेमणूक केली होती. त्यामध्ये पाच हजार ३०० शौचालयांची उभारणी करण्याचे ध्येय होते. परंतु अडीच वर्षांमध्ये या कंत्राटदारांनी केवळ दोन हजार २५३ शौचालयांचीच उभारणी केल्याचे स्थायी समितीच्या बैठकीत उघड झाली आहे. याच मुद्द्यावर सदस्यांनीही पालिकेला धारेवर धरले होते.गेल्या तीन वर्षांत पूर्व उपनगरांमध्ये सार्वजनिक शौचालये पडून पाच ते सहा रहिवाशांचा मृत्यू झाला. मात्र अद्यापही अनेक ठिकाणी धोकादायक शौचालयांचाच वापर रहिवाशांना करावा लागत आहे. महापलिकेने सर्वेक्षण करून धोकादायक शौचालयांची यादी केली आहे. ही शौचालये तोडून त्या ठिकाणी पुन्हा नव्याने शौचालये बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

चेंबूरमधील पालिकेच्या एम पूर्व विभागातील अयोध्या नगर येथील तीन शौचालयांचा समावेश या धोकादायक शौचालयांमध्ये आहे. मात्र येथील रहिवाशांना दुसरी पर्यायी व्यवस्था नसल्याने गेल्या १० वर्षांपासून येथील रहिवासी याच धोकादायक शौचालयांचा वापर करत आहेत.

# धक्कादायक! तापाचं औषध दिल्यानं तरुणाचा मृत्यू

## *पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरू*

**मुंबईः** युनानी डॉक्टरनं दिलेल्या चुकीच्या औषधामुळे घाटकोपरमधील १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. कार्तिक डेडा असं या तरुणाचं नाव आहे. आठवड्याभरापूर्वी ताप आल्यानं कार्तिक घाटकोपर पश्चिमेला असणाऱ्या नजमस क्लिनिकमध्ये गेला होता. त्यावेळी डॉक्टर नझामुद्दीन शेख यांनी इंजेक्शनच्या माध्यमातून त्याला औषध दिलं. मात्र यामुळे कार्तिकला होणाऱ्या वेदना कमी होण्याऐवजी वाढल्या, असा आरोप त्याचा भाऊ जयंत डेडा यानं केला आहे.

कार्तिक १३ ऑक्टोबरला क्लिनिकमध्ये गेला होता. तिथे डॉक्टर शेख यांनी त्याला इंजेक्शन दिलं. मात्र त्यामुळे कार्तिकला होत असलेल्या त्रासात वाढ झाली. त्याला चालताही येत नव्हतं. यानंतर तीन दिवसांनी कार्तिक पुन्हा क्लिनिकमध्ये गेला. त्यावेळी डॉक्टर शेख यांनी त्याला पुन्हा इंजेक्शन दिलं. मात्र क्लिनिकमधून घरी येताच कार्तिक कोसळला, अशी माहिती जयंतनं दिली. यानंतर कुटुंबियांनी कार्तिकला राजावाडी रुग्णालयात दाखल केलं. तेथील डॉक्टरांनी कार्तिकला चांगल्या उपचारांची गरज आहे, असं सांगत त्याला सायन रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला.

शरीराच्या ज्या भागावर डॉक्टर शेख यांनी कार्तिकला इंजेक्शन दिलं होतं, त्या ठिकाणी सूज आणि फोड आल्याची माहिती सायन रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टरांनी दिली. यानंतर फोडाच्या काही भागाची तपासणी करण्यात आली. त्यामधून इंजेक्शन दिलेल्या भागाला गॅंग्रीन झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली. सायन रुग्णालयात दाखल केल्यानंतरच्या १२ तासात कार्तिकचा मृत्यू झाला. शेख यांच्या अक्षम्य हलगर्जीपणामुळे कार्तिकचा मृत्यू झाल्याचा आरोप सायन रुग्णालयातील डॉक्टरांनी केला आहे.



जीवघेण्या संसर्गामुळे कार्तिकचा मृत्यू झाला असावा, असा संशय सायन रुग्णालयाच्या फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख डॉ. राजेश डेरे यांनी व्यक्त केला. कार्तिकच्या मृत्यूचं नेमकं कारण शोधण्यासाठी त्याच्या व्हिसेराची तपासणी केली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. याप्रकरणी पार्क साईट पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेतली आहे. शेख यांच्या क्लिनिकमधील सर्व औषधं आणि इंजेक्शन्स ताब्यात घेण्यात आल्याची माहिती प्रकरणाचा तपास करणाऱ्या पोलिसांनी दिली. शेख यांच्या क्लिनिकची नोंद प्रशासनाकडे आहे. मात्र तरीही आम्ही त्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करत आहोत, असं तपास अधिकाऱ्यांनी सांगितलं. मात्र याबद्दल काहीही बोलण्यास शेख यांनी नकार दिला.

## संपादकीय...



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

# दुष्काळविळखा

सरता पावसाळा बहुतांश कोरडा गेल्यामुळे महाराष्ट्रासमोर पुन्हा दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. मराठवाडा, पश्चिम विदर्भ आणि मध्य महाराष्ट्र या परतीच्या पावसावर अवलंबून असलेल्या भागांकडे यंदा मान्सूनने जातानाही कृपा केली नाही. या वर्षी जून, जुलै, ऑगस्ट महिन्यांत पावसात खंड पडले आणि सप्टेंबर जवळपास पावसाविना गेल्याने दुष्काळाचे चटके आत्ताच बसू लागले आहेत. महाराष्ट्रात पावसाळ्याचा काळ ७ जून ते १५ ऑक्टोबर असा मानतात. सरकारी नोंदीनुसार पावसाळा संपला आहे. राज्यात यावर्षी वार्षिक सरासरीच्या तुलनेत ७५ टक्के पाऊस पडल्याची नोंद आहे. नाशिक विभागात सरासरीच्या ६२ टक्के, तर मराठवाड्यात ६५.९ टक्के पाऊस पडल्याची कृषी विभागाची नोंद आहे. कोकणातील पर्जन्यमान ९५ टक्क्यांपर्यंत पोहोचले. पुणे, अमरावती व नागपूर विभागांत अनुक्रमे ७८.७ टक्के, ७७.७ आणि ७९.८ टक्के पाऊस झाला. नाशिक व मराठवाडा या दोन विभागांपुढील संकट तुलनेत जास्त गहिरे आहे. राज्यात दुष्काळाची चाहूल तशी ऑगस्टमध्येच लागली. त्या महिन्यात सरासरीच्या तुलनेत केवळ ७६.३ टक्के पाऊस पडला. परतीचा पाऊस हामखास पडतो, असा विश्वास असतो; परंतु त्याला यंदा तडा गेला. सप्टेंबरात राज्यात केवळ ५७ मिमी (महिन्याच्या सरासरीच्या तुलनेत २८.२ टक्के) पाऊस पडला. गेल्या दीड-दोन दशकातील हा सर्वात कमी पाऊस असावा. ऑगस्टमध्ये सरासरीपेक्षा कमी पडलेला पाऊस आणि जवळपास कोरडा गेलेला सप्टेंबर यामुळे राज्यासमोर दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. औरंगाबाद आणि सोलापूर या



दोन जिल्ह्यांतील स्थिती सर्वात गंभीर आहे. औरंगाबादच्या ग्रामीण भागात भर पावसाळ्यात टँकरने पाणी गेले. सोलापूर जिल्ह्यात आतापर्यत केवळ ३८ टक्के पावसाची नोंद झाली आहे. गेल्या अडीच महिन्यांत पावसाने पाठ फिरविल्याचा परिणाम धरणांमधील जलसाठ्यावर झाला आहे. राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्यात गेल्यावर्षीच्या तुलनेत १४ ते १५ टक्के घट आहे. मराठवाड्यात ही घट ४४ तर नाशिक विभागात १९ टक्क्यांपर्यंत आहे. उर्वरित राज्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत जलसाठ्यातील घट दहा टक्क्यांच्या आत आहे. मराठवाडा आणि नाशिक या विभागांत धरणांतील पाणीसाठा शेतीसाठी वापरणे शक्य नाही, हेच ही आकडेवारी सांगते. राज्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्यानंतर सरकारी उपायांसाठी फेब्रुवारी-मार्च उजाडत असे. त्यामुळे सरकार पाणीपुरवठ्याची व्यवस्था केवळ उन्हाळ्यातील तीन-चार महिन्यांसाठी करीत असे. महाराष्ट्राने १९७२, २०१२ आणि २०१५ या वर्षात तीव्र दुष्काळ अनुभवला. दरवेळी दुष्काळी उपायांना जानेवारीत सुरुवात होत असे. यावर्षी सरकारने ऑक्टोबरमध्येच दुष्काळी स्थिती असल्याचे मान्य केले आणि तशी पावले टाकण्यास प्रारंभ केला, ही स्वागतार्ह बाब आहे. येणारे आठ-साडेआठ महिने सरकार व प्रशासन यांची सत्त्वपरीक्षा पाहणारे आहेत. यंदा पावसात सुरुवातीपासूनच खंड पडल्याने खरिपाचे पीक हातचे गेल्यात जमा आहे. रब्बीची आशा तर नाहीच नाही. त्याशिवाय चाऱ्याची पिकेही हाती लागलेली नाहीत. त्यामुळे आता चाऱ्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. त्या जोडीला पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न सतावणार आहे. विदर्भाचा काही भाग, पुणे, सातारा या जिल्ह्यांत पावसाचे प्रमाण यंदा तुलनेत जास्त होते. तेथील जलाशयांत जलसाठा आहे. त्यामुळे तेथे रब्बीत चारापिकांच्या लागवडीसाठी सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे. राज्यात सोलापूर, नगर या जिल्ह्यांचे वार्षिक पर्जन्यमान ५०० मिमीपेक्षा कमी आहे; आणि याच जिल्ह्यांत साखर कारखानदारी एकवटली आहे. यावर्षी कमी पावसाच्या पट्ट्यात उसाच्या क्षेत्राला मर्यादा घालण्यासाठी सरकारने पावले उचलली पाहिजेत. दुष्काळाच्या निमित्ताने दीर्घ काळाचा विचार करून सरकारने काही धोरणात्मक बदल करणेही अपेक्षित आहे. सातत्याने कमी होणाऱ्या पर्जन्यमानाचा विचार करता पीकपद्धतीत बदल, शेतमाल प्रक्रिया, विपणन यांवर भर द्यायला हवा. प्रक्रिया, विपणन यात शेतकऱ्यांना सहभागी करून घेताना सरकारने सक्रिय मध्यस्थाची भूमिका बजावली पाहिजे. त्यातून शेतीमधील जास्तीत जास्त नफा स्थानिक पातळीवर राहील आणि ग्रामीण भागात नवे रोजगार मिळतील. या चालू दशकातील हा तिसरा मोठा दुष्काळ आहे. प्राप्त परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी उपाय केले जातीलच; पण या निमित्ताने हवामान बदल, त्याचे शेतीवरील परिणाम यांचा साकल्याने विचार करून उपाय शोधायला हवेत. अन्यथा, 'दुष्काळ आवडे सर्वांना..' असे म्हणत सरकारी यंत्रणा व काही स्वयंसेवी संघटना काम करीत राहतील आणि महाराष्ट्र मात्र दुष्काळमुक्तीची प्रतीक्षाच करीत राहील.

# डिजिटल राष्ट्रवाद

***रिझर्व्ह बँकेने व्हिसा, मास्टरकार्ड अथवा अमेरिकन एक्स्प्रेस आदी कंपन्यांना भारतीय व्यवहारांची माहिती भारतातच साठविण्याचे घातलेले बंधन पाळले जाईलच, अशी तांत्रिक क्षमता आपल्याकडे आहेका? ती नसल्यास पुन्हा अमेरिकी कंपन्यांवर अवलंबून राहावे लागेल..***

माहिती तंत्रज्ञानाच्या साह्यने अथवा क्रेडिट कार्डानी होणाऱ्या आर्थिक देवाणघेवाणीचा संपूर्ण तपशील साठवणारे संगणक भारतातच असायला हवेत ही रिझर्व्ह बँकेची अट मंगळवारपासून अमलात येणे अपेक्षित होते. या संदर्भात रिझर्व्ह बँकेने व्हिसा, मास्टरकार्ड अथवा अमेरिकन एक्स्प्रेस, ॲमेझॉन आदींना दिलेली मुदत सोमवारी, १५ ऑक्टोबरला संपली. या संदर्भातील मूळ आदेश रिझर्व्ह बँकेतर्फे ६ एप्रिल रोजी काढला गेला आणि त्यानंतर २५ एप्रिलला संबंधित कंपन्यांना आवश्यक ती माहिती देण्यात आली. त्यातून १५ ऑक्टोबर ही अंतिम मुदत ठेवली गेली. या मुदतीत या सर्व कंपन्यांनी आपापल्या मार्गानी होणाऱ्या आर्थिक उलाढालींचा सर्व संगणकीय तपशील भारतातल्या भारतातच राहील यासाठी यंत्रणा उभारणे अपेक्षित होते. ती अपेक्षा पूर्ण झालेली नाही. आणि रिझर्व्ह बँकेने या कंपन्यांना मुदतवाढही दिलेली नाही. याचा अर्थ रिझर्व्ह बँकेचा संबंधित निर्णय आहे तसाच लागू होणार आणि या परदेशी कंपन्यांना आपापल्या संगणकीय यंत्रणा भारतात बसवाव्या लागणार. तथापि हे सर्व कसे आणि अर्थातच कधी होणार, हा प्रश्न आहे. परदेशी कंपन्यांचा यास असलेला विरोध हेच कारण केवळ यामागे नाही. रिझर्व्ह बँकेची या निर्णयाच्या अंमलबजावणीतील असहायतादेखील यासंदर्भात विचारात घ्यावी लागेल. या परदेशी कंपन्यांना बँकेचा निर्णय मान्य नाही. तसे करणे खर्चीक आहे अणि हा इतका खर्च करण्याची त्यांची तयारी नाही. परंतु या नियमातून सवलत देण्याची रिझर्व्ह बँकेचीही मनीषा नाही. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाविरोधात संबंधित कंपन्यांनी अर्थ मंत्रालयास गाऱ्हाणे घातले असून त्याचा काय निर्णय लागतो हे पाहावे लागेल. आधार कार्डाच्या निमित्ताने या सरकारची उघड झालेली भूमिका पाहता आणि अर्थमंत्रालयाच्या अधिकारांची वजाबाकी पाहता यातून काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही. तसेच या निर्णयांबाबत पंतप्रधानांची भूमिका निर्णायक असेल. ती काय असेल याचा अंदाज बांधणे अवघड नाही. वरवर पाहता अनेकांना हा निर्णय योग्य वाटण्याची शक्यता आहे. आपल्याच देशातील माहिती परदेशात का, असाही प्रश्न अनेकांना पडू शकेल. पण हा मुद्दा दिसतो तसा केवळ देश विरुद्ध परदेश असा नाही. यात अनेक तांत्रिक प्रश्न गुंतले असून त्या सगळ्यांचा साकल्याने वेध घेणे आवश्यक ठरते.

या अशा ऑनलाइन व्यवहार करणाऱ्या कंपन्या प्राधान्याने अमेरिकी आहेत. व्हिसा, मास्टर वा अमेरिकन एक्स्प्रेस या कंपन्यांची क्रेडिट व्यवसायात जगातच मक्तेदारी आहे. तथापि लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे अमेरिकी आहेत म्हणून या कंपन्यांचे संगणकीय साठे अमेरिकेत आहेत असे नाही. खरे तर ते तसे नाहीतच. आर्यलड, सिंगापूर, हाँगकाँग आदी ठिकाणी हे संगणकीय साठे विखरून ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे या वादास अमेरिकी विरुद्ध भारतीय अशा दुहीत पाहून चालणारे नाही. हे साठे या देशांत आहेत ते भौगोलिक आणि तांत्रिक कारणांमुळे. ही दोन्हीही कारणे पुरेशी स्पष्ट आहेत. तिसरा मुद्दा या देशांतील कडक माहितीभंग कायद्यांचा. त्यामुळेही हे माहिती साठे तेथे असणे योग्यच ठरते. तसेच यातील कोणत्याही कंपनीकडून भारतात व्यवहार झाले तर त्या व्यवहारांच्या पावतीची एक प्रत भारतात आताही ठेवली जातेच. म्हणजे या व्यवहारांची माहिती भारताला मिळत नाही असे अजिबात नाही. ती आताही असतेच. पण तरीही ही माहिती साठवणारे संगणकही आता भारतातच ठेवायला हवेत असे रिझर्व्ह बँक म्हणते. हे असे करायचे कारण वेळ पडल्यास भारतीय बँकिंग नियंत्रकांना या व्यवहारांची छाननी करता यावी, असा युक्तिवाद या संदर्भात केला जातो. तो तितकासा समाधानकारक नाही.

याचे कारण या वादास देशी विरुद्ध परदेशी असे लागलेले वळण. पेटीएम, फोनपे, ओला आदी स्वदेशी कंपन्या या अशा आग्रहामागे आहेत. या कंपन्यांचे माहितीसाठे अर्थातच भारतीय आहेत. कारण या कंपन्याच भारतीय आहेत. त्यांचा परदेशी व्यवसाय तितका नाही. त्यांच्यासमोर आव्हान आहे ते मास्टर, व्हिसा वगैरे कंपन्यांचे. तेव्हा त्या कंपन्यांना रोखण्याचा एक मार्ग म्हणजे माहितीसाठे भारतातच हवेत ही स्वदेशी मागणी. रिझर्व्ह बँकेने परदेशी कंपन्यांशी चर्चा करण्यासाठी सोमवारी बोलावलेल्या बठकीत या वादाचा देशी विरुद्ध परदेशी हा चेहरा उघड झाला. ही चर्चा रिझर्व्ह बँकेचे अधिकारी आणि या परदेशी कंपन्या यांतच होणे अपेक्षित होते. त्यानुसार परदेशी कंपन्यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी पूर्वनियोजित स्थळी पोहोचल्यावर त्यांना तेथे भारतीय कंपन्यांची उपस्थिती आढळली. हे भारतीय कंपन्यांचे अधिकारी आधीपासूनच तेथे होते. यास परदेशी कंपन्यांनी आक्षेप घेतला आणि संयुक्तपणे अर्थमंत्रालयाकडे रिझर्व्ह बँकेच्या पक्षपाताबाबत तक्रार केली. वास्तविक पेटीएम, फ्लिपकार्ट आदी कंपन्यांना भारतीय मानणे यातच शहाणपणाचा अभाव दिसतो. रिझर्व्ह बँकेच्या वा स्वदेशीवाद्यांच्या इच्छेप्रमाणे अर्थव्यवहारांची माहिती समजा भारतीय भूमीवर साठवण्यास सुरुवात झाली असे गृहीत धरले तरी त्याचा फायदा कोण घेणार? गुगल वा ॲमेझॉन वा फेसबुक हे या प्रश्नाचे साधे उत्तर. ते कसे? रिझर्व्ह बँकेच्या अहवालावरून कळेल. या अहवालानुसार २०१७-१८ या काळात आपल्या देशात २,३५८ कोटी इतके प्रचंड अर्थव्यवहार हे क्रेडिट कार्डाच्या द्वारे झाले. यातून उलाढाल झालेली रक्कम आहे २५५,५५१,०६८ कोटी रुपये इतकी महाप्रचंड. याचा अर्थ या सर्व उलाढालींचा तपशील संगणकावर साठवला



जाणार. ही इतकी साठवणक्षमता थेटपणे वा मध्यवर्ती संगणकाद्वारे देणे या वर उल्लेखलेल्या तीन कंपन्यांनाच शक्य आहे. तितकी क्षमता एकेकट्या वा संयुक्त भारतीय कंपन्यांत नाही. या तीनही कंपन्या अमेरिकी आहेत. या अमेरिकी कंपन्यांच्या भारतातील संगणकावर साठवलेल्या माहितीची प्रतिकृती अमेरिकेतील संगणकावर असणारच नाही, याची शाश्वती कशी देणार? आताही व्हिसा, मास्टर आदींतर्फे होणाऱ्या उलाढालींच्या माहितीची प्रतिकृती भारतीय भूखंडावर उपलब्ध करून दिली जाते.

या अशा आग्रहास आणखी एक पलू आहे. तो म्हणजे परदेशीयांच्या माहितीवर काम करणाऱ्या भारतीय कंपन्यांचा. आऊटसोर्सिंग हे भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्रास सापडलेले महत्त्वाचे व्यवसाय साधन. यात परदेशी वा परदेशातील नागरिकांची माहिती भारतीय कंपन्यांना उपलब्ध होते आणि त्या अनुषंगाने आवश्यक ते व्यवहार भारतीय कंपन्यांमार्फत भारतात बसून केले जातात. तथापि, रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाचा परिणाम म्हणून उद्या या परदेशांनी त्यांच्या देशातील माहिती भारतीय कंपन्यांना देण्यास नकार दिला तर? तसे झाल्यास भारतीय आऊटसोर्सिंग उद्योगाची ती अखेर असेल. आज हजारो भारतीय कंपन्या या क्षेत्रात आहेत आणि त्यावर लाखो भारतीय अभियंत्यांचे पोट अवलंबून आहे. तेव्हा हा विचारही या संदर्भात केला जाणे आवश्यक ठरते.

स्वदेशाच्या सर्व गरजा स्वदेशातच भागत असतील तर स्वदेशीचा आग्रह एक वेळ योग्य ठरेल. आज अशी परिस्थिती कोणत्याही देशाची नाही. हेच जागतिकीकरणाचे यश. तेव्हा अशा वेळी अत्याधुनिक अशा 'उद्या'च्या डिजिटल क्षेत्रात 'काल'च्या या कल्पनांचा आग्रह किती धरायचा याचा विचार व्हायला हवा. स्वदेशी अर्थविचारांत कल्पनारम्यता असेलही, पण आर्थिक शहाणपण असेलच असे नाही.

# पालिका रुग्णालयात औषधांचा तुटवडा कायम

## बाहेरून खरेदीचा सल्ला; गरीब,गरजू रुग्णांना विनाकारण आर्थिक भुर्दंड

***नवी मुंबई पालिकेच्या सर्व रुग्णालयात रुग्णांना मोफत औषधे देण्याची तरतूद असताना वाशी येथील सार्वजनिक रुग्णालयातील रुग्णांना औषधे बाहेरुन विकत घेण्यास डॉक्टर सांगत आहेत. गेली अनेक माहिने पालिकांच्या रुग्णालयात औषधांचा तुडवडा असल्याने गरीब,गरजू रुग्णांना विनाकारण आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. पालिका वर्षाला सुमारे ७३ कोटी रुपयांची औषधे करीत असते.***

नवी मुंबई पालिकेची आरोग्य सेवा तीन स्तरांवर आहे. त्यामुळे प्रत्येक विभागात नागरी आरोग्य केंद्र आणि जवळपास माता बाल



संगोपन केंद्र आहेत. वाशी सेक्टर नऊ येथे एक मध्यवर्ती सार्वजनिक रुग्णालय असून या ठिकाणी दररोज दोन हजार बाह्यरुग्ण उपचारासाठी येत असतात. याशिवाय तीनशेच्या वर रुग्ण कायमस्वरूपी उपचारासाठी दाखल झालेले आहेत. ऐरोली आणि नेरुळ येथील १०० खाटांची रुग्णालये बांधून तयार आहेत, पण कर्मचारी व डॉक्टराअभावी ती पूर्ण क्षमतेने सुरू झालेली नाहीत. त्यामुळे पालिकेच्या वाशी येथील रुग्णालयावर मोठ्या प्रमाणात ताण वाढलेला आहे. पालिकेच्या सर्व रुग्णालयांत रुग्णांना मोफत औषधे देण्याची तरतूद आहे, मात्र मागील काही महिन्यांपासून पालिका रुग्णालयात औषधांचा तुटवडा जाणवू लागला आहे.

राज्य सरकारने शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषधे हे हाफकिनकडून घेण्याचे आदेश दिले आहेत. मात्र हाफकिन ही सर्व औषधे पुरविण्यात कमी पडत आहे. त्यामुळे हाफकिनच्या मंजुरीने ही औषधे घाऊक विक्रेत्याकंडून घेण्याची मुभा आहे. त्यात माजी पालिका आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अनेक औषधे खरेदीला मज्जाव केला होता. त्यामुळे औषधांचा तुटवडा आता जास्त जाणवू लागला आहे. पालिकेने नुकतीच कमी पडू लागलेल्या सलाइनची खरेदी केली आहे पण अनेक औषधे अद्याप पालिका रुग्णालयात आलेली नाहीत. त्यामुळे पालिका रुग्णालयात उपचारासाठी गेलेल्या रुग्णांना तेथील डॉक्टर बाहेरून औषधे खरेदी करण्याचा सल्ला देत आहेत. त्यामुळे रुग्णांना हा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. त्यात वाशी रुग्णालयाबाहेर असलेले मेडिकल स्टोअर गेले अनेक दिवस बंद असल्याने रुग्णांची तारांबळ उडत आहे. औषधे मोफत मिळत नसल्याने पालिका रुग्णालयात येऊन उपयोग नाही अशीही चर्चा सुरू झाली आहे.

# बांगलादेशींना आश्रय देणाऱ्यास ठाणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केली अटक

**ठाणे** : मागील सहा महिन्यांपासून घुसखोर बांगलादेशींना आश्रय देणार्या शरद भांने या घरमालकाला बुधवारी ठाणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली. त्या घरमालकाने पोलीस कारवाईतून बचावासाठी बोगस ॲग्रिमेंट तयार केले. तसेच बांगलादेशींकडे मिळालेले शाळा सोडल्याचा दाखला, पॅनकार्ड, मतदान कार्ड बोगस असल्याचीही बाब उघडकीस आली आहे. त्याच्यासह पकडलेल्या बांगलादेशींना येत्या २० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

डोंबिवलीतील मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही बांगलादेशी नागरिक अनधिकृतरीत्या वास्तव्यास असून त्यामध्ये अहमदनगर येथील स्नेहालय या रेस्क्यू होममधून पळालेल्या दोन महिला असल्याची माहिती ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक



कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना मिळाली होती. त्यानुसार, त्यांच्या पथकासह मानपाडा पोलिसांनी ढोकळीगाव, आडिवली येथे संयुक्तरीत्या शुक्रवारी १२ ऑक्टोबर छापा टाकून सात जणांना अटक केली. त्यामध्ये एका भारतीय महिलेसह प्रत्येकी तीन बांगलादेशी पुरुष आणि महिला समावेश आहे. याचदरम्यान, याप्रकरणी चौकशी सुरू असताना, एखादे घर भाड्याने देताना त्याबाबत माहिती पोलिसांना देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने तपास सुरू असताना घरमालक शरद भांने यांनी तशी कोणीही माहिती पोलिसांना दिली नसल्याची बाब पुढे आली. त्यानंतर त्याला अटक केली. तसेच बांगलादेशीला अटक झाल्याची माहिती समजताच त्याने तातडीने बोगस ॲग्रिमेंटही तयार केल्याचे तपास पुढे आहे. तसेच फायल आणि इमदादूल या दोघांकडे बांगलादेशी पासपोर्ट मिळून आले आहे.

# पोलीस दलात सुद्धा MeTooची एण्ट्री




***कारागृहातील महिला कर्मचाऱ्याने केला कारागृह अधीक्षकावर आरोप***

**ठाणे** - सध्या बॉलिवूडमध्ये पेव फुटलेल्या MeToo प्रकरण गाजत असताना ठाण्यातील कारागृहातील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ठाणे कारागृहामध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्याने कारागृह अधीक्षक नितीन वायचळ यांच्यावर शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप एका महिला पोलीस कर्मचाऱ्याने केला आहे. महिला कर्मचाऱ्याच्या भाऊ शादाब पिंजारी यांनी आपल्या बहिणीवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आवाज उठवला आणि मदतीसाठी काँग्रेस प्रवक्ते राजू वाघमारे यांच्याकडे धाव घेतली. त्यानंतर वाघमारे यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक राजवर्धन यांच्याकडे याबाबत लेखी तक्रार केली आहे. या प्रकरणाची चौकशी करून पीडित महिलेला न्याय मिळवून देण्याची मागणी वाघमारे यांनी केली आहे.

# 'नवी मुंबईत पोलिसांची सर्वात मोठी वसाहत उभारणार'

**वाशी-** पोलिसांच्या घरांची समस्या मोठी असल्याने आगामी काळात पनवेलनजीक १२० एकर जागेवर दहा हजार घरांचा सर्वात मोठा गृहप्रकल्प साकारला जाणार आहे. अल्पदरात ९०० चौरस फुटांची ही घरे असतील, अशी माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रताप दिघावकर यांनी राष्ट्रीय खान्देश संस्थेच्या




मेळाव्यात दिली.

वाशी येथे खान्देश मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी खान्देशातून नवी मुंबई परिसरात येत स्व:कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या वेळी मान्यवरांनी चौफेर टोलेबाजी केली. पिस्तोल दिसलं तर काय करणार, पण आता मी घाबरतो असे सांगत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन म्हणाले, लग्नामुळे माणूस कर्जबाजारी होत आहे. याबाबत जागृती घडली पाहिजे. सामूहिक विवाह संकल्पना राबवली पाहिजे. खान्देश संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन केले.

कार्यक्रमात उद्योजक प्रकाश बाविस्कर, नगरसेवक संजू वाडे, शिवसेना उपनेते विजय नाहाटा, माजी विधान परिषद आमदार नरेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल शहरात फेरीवाल्यांचे रस्त्यांवरही अतिक्रमण

**पनवेल** - नगरपालिका असलेल्या पनवेलला महापालिका झाली मात्र येथील फेरीवाल्यांची 'दादागिरी' काही संपली नाही. पदपथांबरोबर आता त्यांनी रहदारीच्या रस्त्यांवरही 'दुकान' मांडल्याने शहरांतील प्रवास नकोसा झाला आहे. पनवेल शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे येथे आजूबाजूच्या गावांतील ग्रामस्थही खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात येतात. मात्र रहदारीचे रस्तेही विक्रेत्यांनी अडवल्यामुळे मोठी अडचण होत आहे.

पनवेल शहरात अनेक प्रकारच्या घाऊ क बाजारपेठा असल्याने शिवाजी चौक, टपाल नाका, उरण नाका येथे खरेदीसाठी गर्दी होत असते. बाहेरून येणाऱ्या ग्राहकांची वाहनांना पार्किंगसाठी कुठे व्यवस्था नसल्याने जागा मिळेल तेथे ती लावली जातात. शिवाजी चौक व टपाल नाक्यावरून दुचाकी, रिक्षा व चारचाकी वाहनांची मोठी गर्दी होत असते. त्यात फेरीवाल्यांनी रहदारीच्या रस्त्यांचा अर्ध्याहून अधिक परिसर व्यापल्यामुळे मुख्य बाजारपेठेत पायी चालणेही अवघड होत आहे. येथे नेहमीच चक्काजाम होत असतो. हे फेरीवाले रस्त्यावर कचराही टाकत असल्याने अस्वच्छता पसरली आहे.

समस्या गंभीर असताना पालिका याकडे डोळेझाक करीत आहे. त्यामुळे या फेरीवाल्यांची



'दादागिरी' वाढली आहे. तत्कालीन आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांनी रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा उगारल्यानंतर रस्ते मोकळे झाले होते. त्यांच्या बदलीनंतर पुन्हा फेरीवाल्यांने आपले बस्तान बसविले आहे.

# आमदारांनी घातली पोलिसांशी हुज्जत

**कल्याण** : गरबा खेळण्यासाठी विरुद्ध दिशेने जाणाऱ्या रिक्षाचा अपघात झाल्याप्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी गरबा आयोजकाला जबाबदार धरत त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. याप्रकरणी कल्याण पूर्वचे आमदार गणपत गायकवाड यांनी हा अपघात आणि आयोजकांचा काय संबंध, असा जाब पोलिसांना विचारला. कारवाई करताना आमदारांनी आपल्याशी हुज्जत घालत गैरवर्तणूक केल्याप्रकरणी पोलिसांनी आमदाराविरोधात स्टेशन डायरीमध्ये नोंद केली आहे.


पूर्वेतील मेट्रो मॉल परिसरात नवरात्रीनिमित्त गरब्याचे आयोजन करण्यात आले होते. तेथे गर्दी होत असल्याने वाहनचालक पत्रीपूल येथील वळसा टाळण्यासाठी नेतिवली येथून विरुद्ध दिशेने वाहन चालवत होते. मंगळवारी रात्री तेथे एका रिक्षाला अपघात झाला. कोळसेवाडी पोलिसांनी घटनास्थळी चौकशीला सुरुवात केली. मात्र, गरबा खेळण्यास जाताना अपघात झाल्याचे अपघातग्रस्त व्यक्तीने सांगितले. त्यानुसार गरबा आयोजकाला जबाबदार धरत पोलिसांनी त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. यावेळी आयोजकांनी आपला



दोष नसल्याचे सांगितले. मात्र, पोलीस कारवाईवर ठाम असल्याने आयोजकांनी गायकवाड यांच्याशी संपर्क साधला. आमदारांनी पोलिसांना समजावण्याचा प्रयत्न करत आयोजकांचा काय दोष, असा प्रश्न केला. याच दरम्यान, पोलीस आणि गायकवाड यांच्यात वाद झाला. याप्रकरणी गायकवाड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

# रावणदहन पाहाणाऱ्या ६१ जणांना रेल्वेने चिरडले

**अमृतसर : रावणदहन पाहाण्यासाठी रेल्वे रुळांवर उभ्या राहिलेल्यांना दोन भरधाव ट्रेनने चिरडल्याची हृदयद्रावक घटना अमृतसरच्या चौडा बाजारमध्ये शुक्रवारी रात्री घडली. या अमृतसरच्या भीषण दुर्घटनेत ६१हून अधिक जण ठार, तर ७२ जण जखमी झाले. रेल्वेचा वेग व उपस्थितांची संख्या बघता, मृतांची संख्या १००वर जाण्याची शक्यता आहे.**



रावणदहन पाहाण्यासाठी हजारो लोक तिथे जमले होते. रावणदहनावेळी फटाके फुटू लागल्याने त्यापासून लोक दूर जाऊ लागले. त्यातील ३०० हून अधिक जण बंद असलेल्या फाटकाजवळील रेल्वे रुळांत जाऊन उभे राहिले. ते सारे जण हा सोहळा पाहाण्यात व त्याचे मोबाइलवर चित्रीकरण करण्यात इतके मश्गुल होते की, फटाक्यांच्या धूमधडाक्यात समोरून ट्रेन येत असल्याचे भानही त्यांना राहिले नाही. एकाच वेळी जालंधरहून अमृतसरकडे एक ट्रेन येत होती तर तेथूनच हावडा मेल जात होती. काही कळायच्या आतच ट्रेन अनेकांना चिरडून पुढे निघून गेली. ज्यांनी एका ट्रेनपासून वाचण्याचा प्रयत्न केला, ते दुसऱ्या ट्रेनखाली आले. थरकाप उडविणाऱ्या या दुर्घटनेत जखमी झालेल्यांना रुग्णालयात नेण्यास तिथे हजर असलेल्यांपैकीच अनेक जण पुढे सरसावले. जखमींना जवळच्याच इस्पितळात दाखल करण्यात आले.

दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती रामनाथ कोविंद, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शोक व्यक्त केला व मृतांच्या वारसांना २ लाखांची मदत जाहीर केली. रेल्वे अधिकाऱ्यांनी घटनास्थळी मदतकार्य सुरु केले. या मदतकार्यावर रेल्वेमंत्री पीयूष गोयल लक्ष ठेवून होते. अमेरिका दौऱ्यातील सर्व कार्यक्रम रद्द करून पीयूष गोयल भारतात परत आले आहेत.

# मिरा-भाईंदरमध्ये मेट्रोकामाच्या दिरंगाईचा गरब्याने निषेध



**भाईंदर** - मिरा-भाईंदरपर्यंत मेट्रोमार्गाचे काम प्रत्यक्षात कधी सुरू होणार, याची प्रतीक्षा सर्वसामान्य मिरा-भाईंदरकरांना आहे. मेट्रोमार्गाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, या मागणीसाठी शिवसेना महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यात गरबा खेळून त्याकडे लक्ष वेधले. तरीही यापुढे सरकारने लक्ष न दिल्यास रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन करण्याचा इशाराही दिला गेला आहे.

गेल्या तीन वर्षांपासून मिरा-भाईंदर मेट्रोची मागणी नागरिक करीत असून स्वत: मुख्यमंत्र्यांनी मिरा-भाईंदर मेट्रोचे वेळोवेळी आश्वासन दिले आहे. काही दिवसांपूर्वीच मिरा-भाईंदर मेट्रो विस्तारास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मात्र केवळ आगामी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अशी मंजुरी किंवा भूमिपूजन न करता प्रत्यक्षात जागेवर मिरा-भाईंदर मेट्रोचे काम सुरू करावे, अशी मागणी शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी लावून धरली आहे. नुसती मंजुरी किंवा आश्वासने नको, प्रत्यक्षात मिरा-भाईंदर मेट्रोचे काम जोपर्यंत सुरू होत नाही तोपर्यंत आम्ही आंदोलन सुरू ठेवणार, असे त्यांनी जाहीर केले आहे. त्यामुळे शिवसेना महिला आघाडीने रात्री भाईंदर पूर्वेकडील चौकात रस्त्यात गरबा नृत्य करून, 'घोषणा खूप झाल्या, आता कामाला सुरुवात करा', अशी मागणी केली. मिरा-भाईंदर मेट्रोच्या मागणीचे फलक हातात घेऊन व भगव्या साड्या परिधान करून महिलांनी हे आंदोलन केले. भाईंदर पूर्व नवघर नाका आणि दीपक रुग्णालय सिग्नल येथे रस्त्यात गरबा नृत्य करून आंदोलन करण्यात आले. 'गाजरे काय दाखविता, मेट्रोचे काम सुरू करा' अशी मागणी महिलांनी केली.

मिरा-भाईंदर मेट्रोसाठी राज्य शासन आणि एमएमआरडीएकडून अनेकवेळा घोषणा झाल्या. आपल्याला मेट्रो मिळणार म्हणून मिरा-भाईंदरकर सुखावलेही. मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेवर खुश झालेल्या जनतेने गेल्या वर्षीच्या मिरा-भाईंदर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मिरा-भाईंदर पालिकेत भाजपला एकहाती सत्ता दिली. आता एक वर्ष उलटून गेले तरी आजवर मेट्रोच्या कामाचा प्रारंभ झालेला नाही.

# आधार केवायसीद्वारे देण्यात आलेले मोबाईल क्रमांक बंद होणार नाहीत; सरकारचे स्पष्टीकरण

**आधार कार्डच्या आधारे देण्यात आलेले मोबाईल क्रमांक बंद करण्यात येणार नाही, असे केंद्र सरकारने गुरुवारी स्पष्ट केले. भारतातील निम्मे मोबाईल फोन अर्थात ५० कोटी मोबाईल फोन**




**क्रमांक बंद होणार असल्याच्या बातम्या माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. हे वृत्त खोटं असल्याचेही सरकारकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

५० कोटी मोबाईल क्रमांक बंद होणार असल्याच्या माध्यमांमध्ये आलेल्या बातम्या या खोट्या आणि तार्किक आहेत. सुप्रीम कोर्टाने आधारबाबत दिलेल्या आदेशात असे कुठेही म्हटलेले नाही की, आधार केवायसीद्वारे देण्यात आलेले मोबाईल क्रमांक बंद करावेत. त्यामुळे लोकांनी कुठल्याही प्रकारे घाबरून जाण्याचे कारण नाही. लोकांनी अशा अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (यूआयडीएआय) आणि केंद्र सरकारच्या दूरसंचार विभाग (डॉट) यांनी संयुक्त निवेदनाद्वारे हे स्पष्ट केले आहे.

मात्र, आधारबाबत निश्चित कायदा नसल्याने सुप्रीम कोर्टाने नवे सीमकार्ड हे आधार केवायसीवर देण्यात येऊ नयेत असे म्हटले असले तरी जुन्या मोबाईलचे कनेक्शन बंद करण्याबाबत कोर्टाने काहीही म्हटलेले नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

# चीनने ब्रह्मपुत्रा नदीचे पाणी रोखले
# अरुणाचल प्रदेशात दुष्काळाचे सावट

नवी दिल्ली : भारतीय सीमेवर चीनच्या सैनिकांनी घुसखोरी केल्याचे अनेकदा निदर्शानास आले आहे. आता चीनने तिबेटमधून भारतात वाहणाऱ्या ब्रह्मपुत्रा नदीचे पाणी अडविल्याचे समजते. यामुळे अरुणाचल प्रदेशातील काही भागात दुष्काळाचा मोठा सामना करावा लागत आहे.



अरुणाचल प्रदेशमधील काँग्रेसचे खासदार निनोंग एरिंग यांनी केंद्रीय जलसंधारन राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांना यासंदर्भात पत्र लिहिले आहे. ब्रम्हपुत्रा नदीचे पाणी अडविल्यामुळे अरुणाचल प्रदेशातील तुतिंग, यिंगकियोंग आणि पासीघाट याठिकाणी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे, असे खासदार निनोंग एरिंग यांनी पत्रात म्हटले आहे. तसेच, या मुद्यावर अर्जुन राम मेघवाल यांच्यासह परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी हस्तक्षेप करावा अशी मागणी केली आहे.

दरम्यान, अरुणाचल प्रदेशातील सियांग जिल्हा प्रशासनाने येथील नदीच्या भागातील लोकांना अलर्ट जारी केला आहे. खासकरुन मच्छिमार व्यवसाय करणाऱ्या नागरिकांना काळजी घेण्यास सांगितले आहे. कारण, चीनने ब्रम्हपुत्रा नदीचे पाणी सोडले तर पूरस्थिती निर्माण घेण्याची शक्यता आहे.

# माथेरानची मिनी ट्रेनसेवा पुन्हा 'ट्रॅक'वर



**मुंबई:** मध्य रेल्वेतर्फे दरवर्षी पावसाळ्यात माथेरान ते नेरळपर्यंतची मिनी ट्रेनसेवा थांबवली जाते. या कालावधीत केवळ माथेरान ते अमन लॉजपर्यंतच मिनी ट्रेन चालवल्या जातात. मात्र, १९ ऑक्टोबरपासून माथेरान ते नेरळ ही मिनी ट्रेनसेवा पुन्हा सुरू झाली आहे. सध्या सहा डब्यांपुरता मर्यादित असलेली ही सेवा आठ डब्यांपर्यंत नेण्याची चाचणी यशस्वी ठरली आहे. पुन्हा चालवण्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये सोमवारी एकूण १७ फेऱ्या चालवल्या जातील. त्यात नेरळ ते माथेरानपर्यंत तीन आणि अमन लॉज ते माथेरानपर्यंत १४ फेऱ्यांचा समावेश आहे. मंगळवार ते गुरुवारपर्यंत नेरळ ते माथेरानपर्यंत दोन आणि अमन लॉज ते माथेरानपर्यंत १२ फेऱ्या चालतील. शुक्रवारी फेऱ्यांची संख्या २१ होणार असून, त्यात तीन फेऱ्या नेरळ ते माथेरान आणि उर्वरित अमन लॉज ते माथेरानपर्यंत चालवल्या जातील. शनिवार, रविवारी एकूण २२ फेऱ्या चालवल्या जातील. त्यात नेरळ ते माथेरानपर्यंत दोन आणि अन्य २२ फेऱ्या अमन लॉज ते माथेरानपर्यंत चालतील.


पृष्ठ १ वरुन

# आश्रय ट्रस्ट आयोजित मिरा-भाईंदर महापालिकेच्या सहयोगाने स्वच्छता ॲप जनजागृती मोहीमेस उपायुक्तांच्या हस्ते शुभारंभ

**सल्लागार प्रदिप सामंत यांनी पुढाकार घेऊन लवकरात लवकर जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य हाती घेतले आहे. यावेळी महानगरपालिकेचे संगणक विभाग राजकुमार घरत, कामगार नेते अंकुश मालुसरे ट्रस्टच्या सचिव प्रिती नाईक व अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन मांजरेकर यांनी केले.**



# 'वाहतूककोंडीवर तुम्हीच उपाय सुचवा' – मुंबई पोलिस



**मुंबई:** मुंबईतील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. याची मुंबई उच्च न्यायालयाने दखल घेतल्यानंतर मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाने एक समिती नेमली आहे. या समितीत विविध क्षेत्रांतील अधिकाऱ्यांचा समावेश असून, सर्वसामान्य नागरिकांनाही या प्रक्रियेत सामावून घेण्यात येणार आहे. त्यानुसार पार्किंग आणि वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, याबाबत अधिकाधिक सूचना पाठवण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

मुंबईत ठिकठिकाणी वाहतूककोंडी होत असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. याबाबत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेच्या सुनावणीवेळी ५ सप्टेंबरला न्यायालयाने यावर तोडगा काढण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार वाहतूक पोलिस विभागाच्या अपर पोलिस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. यामध्ये मुंबई महापालिका, परिवहन विभाग, बेस्ट, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन या विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या समितीवर पार्किंग आणि वाहतूककोंडी समस्येवर उपाययोजना सूचवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

सरकारी यंत्रणा वाहतूककोंडी तसेच पार्किंगची समस्या सोडवण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करतात, मात्र ही समस्या अधिकच बिकट होत आहे. यासाठी नियमांचे उल्लंघन, वाहनांची वाढती संख्या, विकासकामे यांसारखी अनेक कारणे आहेत. ही समस्या सर्वसामान्यांशी निगडीत असल्याने त्यांच्या सूचनाही याकामी ग्राह्य धरल्या जाणार आहेत. त्याअंतर्गत नागरिकांनी वाहतूक कोंडीची ठिकाणे, कारणे आणि उपाययोजना सुचवाव्यात असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# कर्ज पास करण्यासाठी शरीरसुखाची मागणी; महिलेने झोडपलं



**कर्नाटक** - कर्ज पास करण्यासाठी शरीरसुखाची मागणी केली म्हणून एका महिलेने बँक मॅनेजरला झोडपल्याची घटना दावणगिरी जिल्ह्यात घडली आहे. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला असून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं आहे.

# ओडिशामध्ये 'तितली' चक्रीवादळाने हाहाकार, ५७ जणांचा मृत्यू

**भुवनेश्वर** - बंगालच्या खाडीत कमी दाबाच्या पट्ट्यानं तितली या चक्रीवादळानं प्रचंड स्वरूप धारण केलं आहे. या चक्रीवादळामध्ये आतापर्यंत ५७ जणांचा मृत्यू झाला आहे. पाऊस आणि वादळामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून घरांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे. गुरुवारी तितली चक्रीवादळ हे ओडिशा आणि आंध्र प्रदेशाच्या समुद्रकिनाऱ्यावर येऊन धडकले होते त्यानंतर या परिसराला चक्रीवादळाचा तडाखा बसला.



ओडिशामध्ये प्रशासनाकडून हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. काही दिवस शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती. तसेच आतापर्यंत जवळपास लाखो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. ओडिशाचे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी परिस्थितीची माहिती घेतली असून त्यांनी गंजम, पुरी, खुर्दा, केंद्रपाडा आणि जगतसिंहपूर या जिल्ह्यातील कलेक्टरांना तटवर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांची घरं तातडीने रिकामी करण्यास सांगितलं होते. तसेच नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी निवारागृहे उभारण्यास सांगण्यात आले आहे.

# चीन आकाशात सोडणार मानवनिर्मित चंद्र!



चीन या देशाचे नाव घेतल्यावर दोन गोष्टी डोळ्यासमोर येतात पहिली म्हणजे लोकसंख्या आणि दुसरी त्यांनी लावलेले भन्नाट शोध. जगभरातील बाजारपेठांमध्ये 'मेड इन चायना' टॅग असणाऱ्या एकाहून एक भन्नाट वस्तू हातोहात विकल्या जातात. मात्र सध्या जगभरात चर्चा सुरु आहे चीनच्या आणखीन एका भन्नाट कल्पनेची. ही कल्पना म्हणजे आकाशात तीन मानवनिर्मित चंद्र सोडण्याची तयारी चीनने सुरु केली आहे.

चीनमधील चेंगडू शहरामधील रस्त्यांवरील दिव्यांच्या जागी या मानवनिर्मित चंद्राचा वापर करण्याच्या वैज्ञानिकांचा मानस आहे. हे तीन चंद्र नैसर्गिक चंद्रापेक्षा आठ पटींने अधिक तेजस्वी असतील अशी माहिती वू चुनफेंग यांनी दिली. वू चुनफेंग हे चीनमधील सिचुआन प्रांतातील 'चेंगडू एरोस्पेस सायन्स ॲण्ड टेक्नोलॉजी मायक्रोइलेक्ट्रॉनिक्स सिस्टम रिसर्च इंस्टिट्यूट कॉर्पोरेशन'चे अध्यक्ष आहेत. ही संस्था आकाश संशोधन क्षेत्रात काम करते.

चीनमधील सरकारी वृत्तपत्र असलेल्या 'पिपल्स डेली'नं दिलेल्या वृत्तानुसार या चंद्रांमुळे चेंगडू शहरामधील १० ते ८० किलोमीटरचा परिसराला रात्रीच्या वेळी प्रकाश मिळेल. या प्रकल्पामुळे चेंगडू शहरामध्ये रात्रदिव्यांवर होणाऱ्या एकूण खर्चामधून दरवर्षी २४ कोटी रुपये वाचतील असे चुनफेंग यांनी सांगितले. पुढील दोन वर्षांमध्ये म्हणजेच २०२० पर्यंत चीन हे तीन कृत्रिम चंद्र अवकाशात सोडणार असल्याचे 'पिपल्स डेली'ने आपल्या वृत्तात म्हटले आहे.

*असे असतील हे चंद्र*

तांत्रिक भाषेत सांगायचे तर हे तीन मानवनिर्मित कृत्रिम चंद्र म्हणजे उपग्रह असतील. या उपग्रहांवर आरसश्यासारख्या परावर्तित करणाऱ्या वस्तूपासून बनवलेले आवरण लावलेले असेल. ज्याप्रमाणे नैसर्गिक चंद्रावर पडणार प्रकाश परावर्तित होऊन पृथ्वीवर पडतो त्याचप्रमाणे या उपग्रहांच्या पृष्ठभागावर पडलेला प्रकाश परावर्तित होऊन पृथ्वीवर पडेल. पुढील दोन वर्षात हे चेंगडू शहरावर जमीनीपासून ५०० किलोमीटरवर स्थिरावले जातील. खरा चंद्र पृथ्वीपासून ३ लाख ८४ किलोमीटरवर आहे तर हे चंद्र अवघ्या ५०० किलोमीटरवर असल्याने ते नैसर्गिक चंद्रापेक्षा अधिक प्रकाशित दिसतील. हे चंद्र आकाशात स्थिरावल्यानंतर चेंगडू शहराला पथदिव्यांची गरजच भासणार नाही.

# व्हिडीओमुळे पोलीस अधिकाऱ्याला मसाज पडला महागात, झाले निलंबित!


**कैमूर :** बिहार येथील कैमूरमध्ये गेल्या २४ तासांपासून एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. यामध्ये एका पोलीस स्टेशनमध्ये अधिकारी मसाज करुन घेताना दिसत आहेत. दरम्यान, या व्हिडीओची पडताळणी केल्यानंतर समजले की, हा व्हिडीओ जिल्हातील चैनपूर पोलीस स्टेशनमधील वरिष्ठ उप अधिक्षक जफर इमाम यांचा आहे.

व्हिडीओमध्ये वरिष्ठ उप अधिक्षक जफर इमाम पोलीस स्टेशनमध्ये काम करतेवेळी एका व्यक्तीकडून मसाज करुन घेत आहेत. तसेच, यावेळी जफर इमान काही फिर्यादींची तक्रार नोंदवून घेताना दिसत आहेत. विशेष म्हणजे, वर्दीत असताना ते मजाज करुन घेत आहेत.

दरम्यान, हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर जफर इमाम यांना



निलंबित करण्यात आले आहे. कैमूरचे पोलीस उपनिरीक्षक अजय प्रसाद यांनी सांगितले की, या घटनेमुळे समाजात पोलिसांची बदनामी होत आहे. त्यामुळे जफर इमाम यांच्याकर कारवाई करत त्यांना निलंबित केले आहे.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर नि:शुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)